मंत्री
शालेय शिक्षण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०१४

बाल स्वच्छता मोहिमेत लोकप्रतिनिधींना सहभागाचे आवाहन

प्रिय महोदय / महोदया,

दि.०२ ऑक्टोबर, २०१४ रोजी महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून बालकांमध्ये स्वच्छता व आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी **मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी** यांनी भारत सरकारतर्फे "**स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय**" ही मोहीम सुरू केली आहे. शाळा हे शिक्षणाचे केंद्रबिंदू आहे. बालकांच्या माध्यमातून पालक व समाज यांचेपर्यंत स्वच्छता, आरोग्य व नीटनेटकेपणाचा संदेश पोहोचविता येईल. याकामी बालक आदर्श व परिणामाकारक भूमिका बजावू शकतात. मोहिमेच्या स्वरूपात शाळांमध्ये **स्वच्छता व आरोग्य** या विषयाकडे विशेष लक्ष केंद्रीत करण्यासाठी **दि. १४ ते १९ नोव्हेंबर, २०१४** या कालावधीत **बाल स्वच्छता मोहीम** देशभरात राबविण्यात येणार आहे. सन २०१९ पर्यंत **स्वच्छ भारत** हे ध्येय साध्य करण्यासाठी आपल्या सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. या मोहिमेतर्गत शाळांमधून विविध उपक्रम राबविण्यासाठी राज्य शासनाने दि. ०३ नोव्हेंबर, २०१४ रोजी सविस्तर मार्गदर्शक सूचना शासकीय यंत्रणेस दिल्या आहेत.

या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने आपली भूमिका महत्वपूर्ण आहे. स्वच्छ शाळा व स्वच्छ परिसर, स्वच्छ व संतुलित आहार, वैयक्तिक स्वच्छता, स्वच्छ पाणी आणि स्वच्छ शौचालय या बाबींवर लक्ष केंद्रित करून त्याचे महत्व पटवून देण्यासाठी विविध उपक्रम मोहिमेच्या कालावधीत राबविण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने आपल्या मतदार संघातील शाळांना दि.१४ ते १९ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत भेटी देऊन उपक्रमामध्ये सहभागी होऊन बालकांना उत्साहवर्धक व आनंददायक वातावरण, स्वच्छतेचे सवय व शाळेबाबतची गोडी निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. तसेच **स्वच्छता व आरोग्य** या विषयावर बालक, पालक व समाज यांच्याशी संवाद करावा. त्याचा उपयोग बालकांची नियमित उपस्थिती टिकून राहण्यासाठी, शालेय उपक्रमातील सहभाग वाढविण्यासाठी व जनजागृती करण्याच्या दृष्टीने उपयुक्त होईल. मला आशा आहे की, आपण प्रत्येकजण सामाजिक बांधिलकी व उत्तरदायित्व या नात्याने आपल्या परिसरातील प्रत्येक शाळा स्वच्छ, सुंदर व आकर्षक करण्यासाठी योगदान देऊन बालकांना आनंददायी वातावरणात गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण प्राप्त करून देण्याचा निश्चय करूया. याकामी आपण सर्वजण उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन **बाल स्वच्छता मोहीम** यशस्वी करण्याचा निर्धार करूया.

आपला विश्वास,

(विनोद तावडे)

प्रति,

मा. सरपंच, ग्रामपंचायत / सभापती व सदस्य पंचायत समिती / नगराध्यक्ष, सभापती व नगरसेवक, नगर परिषद, नगरपालिका, नगर पंचायत / महापौर, सभापती व नगरसेवक महानगरपालिका / अध्यक्ष, सभापती, सदस्य जिल्हा परिषद / आमदार / खासदार